जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २३८ दिनांक - १७/०५/२०२४**

खंडणी विरोधी पथक २ गुन्हे शाखा,पुणे शहर

## व्यवसायिकास बेकायदेशीर पैशाची मागणी करणा-या बापू नायर गुन्हेगार टोळीतील सराईत गुन्हेगार व त्याचे साथीदारावर खंडणी विरोधी पथक २,गुन्हे शाखा पुणे शहर कडून कारवाई

तक्रारदार हे इलेक्ट्रीक व्यवसायिक असुन त्यांचा प्लॉट खरेदी विक्रीचा देखील व्यवसाय आहे. तक्रारदार यांना रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार तबरेज सुतार हा बेकायदेशीर पैशाच्या मागणी साठी धमकावत असलेबाबतची तक्रार खंडणी विरोधी पथकास प्राप्त झाली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने रेकार्डवरील सराईत गुन्हेगार तबरेज मेहबुब सुतार रा.कात्रज पुणे हा त्याचे साथीदारासह तक्रारदार यांना त्यांचे व्यवसायात खुप आर्थिक फायदा झाला असुन भविष्यात व्यवसाय सुरळीत सुरु ठेवण्यासाठी खंडणी स्वरुपात जीवे ठार मारण्याची धमकी देवुन १० लाख रुपये स्वीकारुन आणखीन ३० लाख रुपयेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपी नामे १)तबरेज मेहबुब सुतार,रा.कात्रज पुणे २)अविनाश नामदेव मोरे,रा.सहकारनगर पुणे ३)सागर किसन धुमाळ,रा.अपर डेपो पुणे, ४) कुमार ऊर्फ पप्पु सायकर रा.सासवड,पुणे यांचेविरुध्द भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.४०३/२०२४ भादविक ३८६,३८७,५०४,५०६(२),५०७,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी यांचा शोध घेत असताना खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखेकडील पथकाने आरोपी नामे अविनाश नामदेव मोरे,रा.सहकारनगर पुणे व सागर किसन धुमाळ,रा.अपर डेपो पुणे यांना ताब्यात घेतले असुन ते सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहेत.तसेच आरोपी नामे तबरेज मेहबुब सुतार,रा.कात्रज पुणे हा बापु नायर टोळीतील सक्रिय सदस्य असुन तो मार्च २०२२ रोजी पासुन जेलमध्ये आहे.तबरेज मेहबुब सुतार याचेवर खुन,खुनाचा प्रयत्न असे एकुण ०७ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सर्व व्यापारी,व्यावसायीक,कंपनी प्रतिनिधी यांना अनिकृत माथाडी व खंडणी संदर्भात बेकायदेशीर पैशाची मागणी,अडवणुक होत असल्यास त्या संदर्भात तात्काळ संपर्क करण्याचे आवाहन पुणे शहर पोलीस दलामार्फत करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२ श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक २,गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, पोलीस उपनिरीक्षक मोहनदास जाधव,श्रीकांत चव्हाण पोलीस अंमलदार विजय गुरव,प्रदिप शितोळे, सुरेंद्र जगदाळे,सचिन अहिवळे,दिलीप गोरे,संग्राम शिनगारे,सैदोबा भोजराव,पवन भोसले,चेतन शिरोळकर,अमोल राऊत,प्रशांत शिंदे यांनी केलेली आहे.